



# महाराष्ट्र शासन
## उच्च व तंत्र शिक्षण विभाग





नरेंद्र मोदी
मा. पंतप्रधान

देवेंद्र फडणवीस
मा. मुख्यमंत्री

विनोद तावडे
मा. मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण

रवींद्र वायकर
मा. राज्य मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण

### ➢ राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना-:-

- मान्यता प्राप्त संस्थांमध्ये पात्र व्यावसायिक अभ्यासक्रमात प्रवेश घेणारे आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थी केवळ निधी अभावी व्यावसायिक अभ्यासक्रमांपासून वंचित राहू नयेत म्हणून, एक सामाजिक बांधिलकी व घटनात्मक उत्तरदायित्व म्हणून महाराष्ट्र शासनाचा धोरणात्मक निर्णय.
- शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, दि. ३१ मार्च, २०१८ अन्वये मान्यता प्राप्त व्यावसायिक व उच्च शिक्षण अभ्यासक्रमात शिकणा-या आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना राज्य शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेंतर्गत ज्यांच्या पालकांचे **वार्षिक उत्पन्न रु.८.०० लाखापर्यंत** आहे अशा विद्यार्थ्यांनी व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेतून प्रवेश घेतल्यास त्यांना शैक्षणिक व परीक्षा शुल्काच्या **५० टक्के शिष्यवृत्ती** म्हणून अदा करण्यात येईल.

### ➢ डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना-:-

- शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, दि. २२ फेब्रुवारी, २०१८ अन्वये मान्यता प्राप्त व्यावसायिक व उच्च शिक्षण अभ्यासक्रमात शिकणा-या अल्पभूधारक शेतकरी व नोंदणीकृत मजूर यांच्या महानगरातील संस्थांमध्ये शिक्षण घेणा-या पाल्यांना, **प्रतिवर्ष** रु.३०,०००/- व इतर ठिकाणी शिक्षण घेणा-या पाल्यांना, **प्रतिवर्ष** रु.२०,०००/- इतका वसतिगृह निर्वाह भत्ता जास्तीत जास्त दहा महीन्यांसाठी अनुज्ञेय राहील. तसेच,
- इतर विद्यार्थ्यांच्या कुटूंबाचे (दोन्ही पालकांचे एकत्रित,) **वार्षिक उत्पन्न** रु. ६.०० **लाखापर्यंत** असल्यास, महानगरातील संस्थांमध्ये शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांना **प्रतिवर्ष** रु.१०,०००/- व इतर ठिकाणी शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांना, **प्रतिवर्ष** रु.८,०००/- इतका वसतिगृह निर्वाह भत्ता जास्तीत जास्त दहा महीन्यांसाठी अनुज्ञेय राहील.

(वरील दोन्ही योजनांचा लाभ हा कुटूंबातील केवळ दोन अपत्यांपर्यंत मर्यादित राहिल)

(वरील दोन्ही योजनांचा लाभ सुलभ पद्धतीने व तात्काळ अदा करता यावा, याकरिता मंजूर रक्कम विद्यार्थ्यांच्या आधार संलग्नित बँक खात्यामध्ये जमा करण्यात येईल.)

❖ टिप :- वरील योजनांचे अर्ज ऑनलाईन पद्धतीने भरावयाचे आहेत. पात्रतेचे निकष व अधिक माहिती तंत्रशिक्षण संचालनालयाचे संकेतस्थळ - www.dtemaharashtra.gov.in वर उपलब्ध आहेत.